<u>नियमीत दिवाणी दावा क्र.१०४१/२०२३</u>

<u>नि.क्र. २३ सोबत</u>

<u>दत्ता करकिले वि.जहागीर शेख</u>

**<u>वादी यांचे साक्षीदार क्रं.१ यांचा शपथेवर उलटतपास प्रतिवादीतर्फे श्री.ए.एस.पठाण वकील यांच्या मार्फत सुरु–</u>**

मला लिहता वाचता येते. माझे शिक्षण बारावी इयत्ते पर्यंत झालेले आहे. मला एक भाउ व एक बहीण आहे. वाद मिळकती प्लॉट स्वतः खरेदी केला नसून माझे वडीलांनी खरेदी केला आहे. माझे वडीलांची नावे खरेदी पत्राची मुळ प्रत मी दाव्याच्या कामी दाखल केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादाच्या मिळकतीमध्ये आमचे अस्तीत्व नाही. वादा मिळकतीमध्ये माझे वडीलांचे नावे किंवा माझे नावे लाइट बिल किंवा पाणी पट्टीचे बिल नाही. गावच्या आठ–अ ला माझे वडीलांची नोंद होती ती अलीकडच्या काळात कमी करण्यात आली हे मी नक्की कालावधी सांगू शकत नाही. माझे वडीलांच्या नावाची नोंद आठ–अ च्या नावावरुन कमी केली त्यावेळी आम्हाला ग्रामपंचायतने नोटीस दिली नव्हती. ग्रामपंचायतने आठ–अ ची नोंद का रद्द केली याचे कारण मी सांगू शकत नाही.

आठ–अ ची नोंद कमी झाली म्हणून मी महसूल न्यायालयात दाद मागीतली नव्हती. मी दिवाणी कोर्टात तक्रार केली होती. वडीलांच्या नावाची नोंद का रद्द करण्यात आली याबद्दल आम्हाला ग्रामपंचायतने कोणतेही कारण कळविले नाही. तारीख ०८.०१.८६ रोजी खरेदी खत ७९/१९८६ साली प्रमाणे नोंदविलेला व्यवहाराचा दस्त मी दाव्याच्या कामी दाखल केलेला नाही. मी आज पर्यंत कर भरलेल्या पावत्या न्यायालयात दाखल केलेल्या आहेत. मी दावा मिळकतीमध्ये पत्र्याचे शेड मारण्यासाठी गेलेलो होतो. मला प्रतिवादी धमकी दिली कि घर बांधायचे नाही याबाबत मी पोलिस स्टेशनला जावून तक्रार दिली. मी पोलिस स्टेशनला तक्रार दिली त्याबाबत कोणतेही एन.सी.ची पावती दाखल केली नाही. माझे दावा मिळकतीच्या वर्णनामध्ये दावा मिळकतीचा सर्वे क्रं.२००

म्हणून नमुद केलेला आहे. परंतू खरेदीपत्रामध्ये सर्वे क्रं. २०० चा उल्लेख आहे.

**न्यायालयाची वेळ संपल्यामुळे उलटतपास पुढील तारखेपर्यत तहकुब.**

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत**

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2026.01.06 11:26:33 +0530

**( श्री व्ही. आर. घराळ )**

**उदगीर.** **सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**

**दिनांकः– ०५.०१.२०२६** **उदगीर.**